राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - एसईसी-२००९/प्र.क्र.४९/का.११,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक-४ फेब्रुवारी, २०१२.

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप करण्यासंदर्भात दिनांक- ३१/३/२००९ रोजी महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ जारी केलेले आहेत. या आदेशातील परिच्छेद-८ मध्ये नोंदणीकृत राजकीय पक्षांद्वारे उभ्या करण्यात येणाऱ्या उमेदवारांना व अपक्ष उमेदवारांना चिन्हांची निवड व चिन्ह वाटप करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर आदेशानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून इतर महानगरपालिका तसेच नगर परिषदा/नगर पंचायतींमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्यात आली. परिणामी, एका प्रभागात एकापेक्षा जास्त जागांसाठी मतदान घेण्यात येते. त्यामुळे या निवडणुकीमध्ये अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभ्या करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहित करून देणे आवश्यक झाले आहे. सबब, उपरोक्त आदेशातील परिच्छेद-८ च्या खालील पुढे नमूद केल्याप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे:-

**परिच्छेद-८ च्या खालील परंतुक**

परंतु, बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणुकीमध्ये अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करताना पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा:-

(१) चिन्ह वाटप करताना प्रभागनिहाय चिन्हांचे वाटप होईल. प्रभागातील सर्व जागांकरिता चिन्हांचे वाटप एकाच वेळी सुरू होईल.

(२) एकच चिन्ह एका प्रभागातील जागांवर अग्रक्रमानुसार एकापेक्षा जास्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी मागितले असेल तर, त्या चिन्हाचे वाटप कोणत्या पक्षाच्या उमेदवारास करावे हे सोडतीने निश्चित करण्यात येईल.

(३) त्यानुसार एखाद्या प्रभागात एखादे चिन्ह एका नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवारास वाटप केल्यानंतर ते चिन्ह त्याच प्रभागातील दुसऱ्या जागेवरील त्याच पक्षाच्या अन्य उमेदवारास त्याच्या मागणीनुसार वाटप करता येईल. मात्र अन्य पक्षाच्या उमेदवारास अथवा अपक्ष उमेदवारास ते चिन्ह त्याच प्रभागात देता येणार नाही.

(४) अशा प्रकारे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाना चिन्हाचे वाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवाराना चिन्हाचे वाटप करताना एका प्रभागातील जागांवर अग्रक्रमानुसार एकच चिन्ह एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांनी मागितले असल्यास त्या चिन्हाचे वाटप कोणत्या अपक्ष उमेदवारास करावे हे सोडतीने निश्चित करण्यात येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत एकच चिन्ह एकाच प्रभागात एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांना देण्यात येणार नाही.

(५) प्रभागातील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हे, वाटप करण्याकरिता कमी पडत असतील तर अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी गरजेनुसार नवीन चिन्हांचा अंतर्भाव करून त्या चिन्हाचे उमेदवारांना वाटप करतील व तसे राज्य निवडणूक आयोगास कळवतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,

C:\Documents and Settings\MR. NITIN\Desktop\Cast Validity Letter.doc

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का-११
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ५/०२/२०१२

वाचा :- १. आयोगाचे आदेश क्र. क्रमांक-एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का-११, दि.३१ मार्च,२००९

२. आयोगाचे आदेश क्र. क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का-११, दि.४ फेब्रुवारी,२०१२

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ३१ मार्च, २००९ व दि. ४ फेब्रुवारी, २०१२ च्या आदेशांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक (ग्रामपंचायत निवडणूक वगळून) लढविणाऱ्या उमेदवाराद्वारे चिन्हाची निवड व त्यांना चिन्ह वाटप करण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहित करुन देण्यात आलेली आहे. यासंदर्भात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी उपस्थित करण्यात येणाऱ्या मुद्दयांवर पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रात त्याला राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याबाबत घोषणा केलेली असेल तर व त्याने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या बाबतीत नमुना २ (अ) व २ (ब) व महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायतींच्याबाबतीत जोडपत्र १ व २ विहित कालावधीत सादर केले असल्यास अशा उमेदवारास या राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याचे समजले जाते. एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास व त्यामध्ये एकापेक्षा जास्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याबाबत नामनिर्देशनपत्रात घोषणा केली असल्यास किंवा अपक्ष

उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी :-

१) एकाच उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांची नमुना २ (अ) व २ (ब) किंवा यथास्थिती जोडपत्र १ व २ सादर केले असल्यास नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षाने लेखी सूचना देऊन नमुना २ (ब) किंवा यथास्थिती जोडपत्र २ मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास ज्या पक्षाने नमुना २ (ब) किंवा जोडपत्र २ मागे घेतलेले नाही त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे.

२) जर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेले नमुना २ (ब) किंवा यथास्थिती जोडपत्र २ शिल्लक राहिले असल्यास त्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी दिल्यास त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे.

३) जर वरील अ.क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी न दिल्यास त्याने प्रथम ज्या पक्षाच्यावतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या राजकीय पक्षाचा तो अधिकृत उमेदवार आहे असे मानण्यात यावे.

४) एखाद्या उमेदवाराने अपक्ष उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास चिन्ह वाटप करतांना त्याने प्रथम दाखल केलेल्या वैध नामनिर्देशनपत्रात नमूद केलेला चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेण्यात यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अशोक कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त.